


अपेक्षा

सुख, दुःख मान, अपमान
कधी प्रेम कधी उपेक्षा
जन्मदात्री एकच साऱ्यांची
नाव तीचं अपेक्षा

तीन अक्षरी शब्द छोटा
किर्ती मात्र थोर
पूर्ण झाली नाही म्हणजे
शिक्षा होतेच कठोर

नातं कुठलंही असो
हीचं वर्चस्व ठरलेलं
उगवणार तेच पण
जे असतं पेरलेलं

अपेक्षेला कसं कळतं
कुठे घर बांधायचं ?
कुठे कसं उसवायचं
अन कुठे कसं सांधायचं ?

पूर्ण होत असते तेव्हा
कुणी दखल घेत नाही
डंख एकच असा मारते
आस्तित्व तिचं स्मरणात राही

प्रेमाच्या बदल्यात प्रेम
अपेक्षा नाही मोठी
अपेक्षा ती पूर्ण व्हावी
ही इच्छा वांझोटी

नात्यात अपेक्षांचं आस्तित्व
अपरिहार्य कधीच नसतं
निरपेक्ष नाती जपणं
का मग इतकं अवघड असतं ?

काय मिळालं न पाहता
करता यावं अर्पण
कृष्णार्पण म्हणून करावे
साऱ्या अपेक्षांचे समर्पण

सौ. गौरी मंदार गानू

